नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ४८ Issue - 48 | वार - रविवार दि. १२ जुलै २०२६ Blow- Sunday Date 12 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# व्हिएतनाम बोट दुर्घटनेत १५ भारतीयांचा मृत्यू



## २१ जणांना वाचवण्यात यश; दूतावासाकडून तातडीची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

व्हिएतनाम : व्हिएतनाममधील अतिशय लोकप्रिय अशा 'फू क्कोक' बेटाजवळ पर्यटनासाठी गेलेल्या भारतीयांवर मोठा अनर्थ ओढवला आहे. एका भीषण दुर्घटनेत पर्यटकांना घेऊन जाणारी बोट समुद्रात उलटून १५ भारतीय पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला आहे. मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, या स्पीडबोटमध्ये एकूण ३६ जण प्रवास करत होते, ज्यामध्ये ३२ भारतीय पर्यटक आणि ४ स्थानिक क्रू मेंबर्स (बोट कर्मचारी) यांचा समावेश होता. ही बोट 'हॉन मे रुत न्गोई' बेटाच्या परिसरातून जात असताना हा अपघात झाला. या घटनेनंतर व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने स्थानिक प्रशासनाशी तातडीने संपर्क साधला असून, तेथील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

भारतीय दूतावासाची तत्परता आणि हेल्पलाईन क्रमांक जारी

या हृदयद्रावक घटनेची गांभीर्याने दखल घेत, भारतीय दूतावासाने बोटीतील सर्व ३२ भारतीय प्रवाशांची नावे 'द' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जाहीर केली आहेत. प्रवाशांच्या नातेवाईकांना तातडीने योग्य ती माहिती आणि मदत मिळवून देण्यासाठी 'हो चि मिन्ह सिटी' मधील भारताचे वाणिज्य दूतावास आणि 'हनोई' मधील मुख्य दूतावासात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

मदतीसाठी संपर्क क्रमांक :

हो चि मिन्ह सिटी नियंत्रण कक्ष : +८४ ३६ २८१ ७९३०, +८४ ९१ ५५२ ३७ १४, आणि +८४ ३३ ४५२ ०४१४

हनोई नियंत्रण कक्ष : +८४ ९१ ३०८ ९१६५

प्रत्यक्षदर्शींचा थरार आणि अडथळ्यांचे बचावकार्य

ही भयंकर दुर्घटना 'हॉन मे रुत' बेटापासून अवघ्या ४०० मीटर अंतरावर घडली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बोट उलटल्याचे पाहताच आजूबाजूच्या इतर बोटींनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि प्रवाशांना पाण्यातून बाहेर काढण्यास सुरुवात केली. त्यानंतर काही वेळातच व्हिएतनामचे सीमा सुरक्षा दल, नौदल, कोस्ट गार्ड आणि इतर आपत्कालीन बचाव पथके मदतीसाठी दाखल झाली. मात्र, अनेक प्रवासी उलटलेल्या बोटीच्या आतच अडकल्यामुळे बचावकार्यात मोठे अडथळे निर्माण झाले होते.

२१ जण बचावले, जखमींवर उपचार सुरू

स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, बचाव पथकांच्या अथक प्रयत्नांनंतर आतापर्यंत २१ जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले आहे. मात्र, दुर्दैवाने या दुर्घटनेत १५ पर्यटकांचे मृतदेह हाती लागले आहेत. जे प्रवासी या अपघातात जखमी झाले आहेत, त्यांना तातडीने नजीकच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर सखोल वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

लाखो पर्यटकांचे आकर्षण असलेले 'फू क्कोक' बेट

थायलंडच्या आखातात वसलेले 'फू क्कोक' हे व्हिएतनाममधील सर्वात मोठे आणि प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. या बेटाच्या दक्षिणेस सुमारे १० किलोमीटर अंतरावर असलेले 'हॉन मे रुत' बेट हे त्याच्या पांढऱ्याशुभ्र वाळूच्या किनाऱ्यांसाठी आणि नितळ पाण्यासाठी जगभर ओळखले जाते. याच निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी दरवर्षी जगभरातून लाखो पर्यटक येथे येतात.


हा भीषण अपघात नेमका कशामुळे घडला ? याबाबत कम्युनिस्ट पक्षाचे प्रांतीय अधिकारी गुयेन टिएन हाई यांनी प्रसारमाध्यमांना माहिती दिली. त्यांच्या प्राथमिक अंदाजानुसार, समुद्रात अचानक आलेले जोरदार वारे आणि उसळलेल्या महाकाय लाटा यामुळे ही स्पीडबोट अनियंत्रित होऊन उलटली असावी. सद्यस्थितीत प्रशासन बचावलेल्या प्रवाशांची नेमकी संख्या निश्चित करत असून घटनेची सखोल चौकशी सुरू आहे.

व्हिएतनाममधील 'फू क्कोक' बेटाजवळ भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी बोट उलटल्याची हृदयद्रावक घटना समोर आल्यानंतर संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भीषण दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर शोकसंदेश जारी करत म्हटले आहे की, व्हिएतनाममध्ये भारतीय पर्यटकांसोबत घडलेल्या या बोट दुर्घटनेची बातमी अत्यंत दुःखद आहे. ज्या कुटुंबांनी आपले आप्तस्वकीय गमावले आहेत, त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. जखमी प्रवासी लवकरात लवकर बरे व्हावेत, यासाठी मी प्रार्थना करतो. तसेच, व्हिएतनाममधील भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावास बाधित कुटुंबांना शक्य ती सर्व मदत करत असून, ते व्हिएतनामच्या स्थानिक प्रशासनासोबत सातत्याने संपर्कात असल्याचेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले.

# तब्बल ७६ तासांनंतर ढिगाऱ्याखाली ४ जण आढळले!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पिंपरी चिंचवड येथील मोशी कचरा डेपोमध्ये कोसळलेल्या इमारतीच्या भीषण दुर्घटनेला आता चार दिवस उलटून गेले आहेत. मागील चार दिवसांपासून ढिगाऱ्याखाली अडकलेल्या जिवांसाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू होते. जसजसा वेळ जात होता तसतशी जगण्याची आशा मावळत चालली होती; पण आज, चौथ्या दिवशी एक मोठा चमत्कार पाहायला मिळाला. सलग सुरू असलेल्या या शोधमोहिमेत आज तब्बल ४ कामगारांना ढिगाऱ्याखालून जिवंत बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, तातडीने या चारही बचावलेल्या कामगारांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या ढिगाऱ्याखाली एकूण ८ जण अडकल्याची भीती होती, त्यापैकी आता केवळ एका कामगाराचा शोध बाकी असून लवकरच ही बचाव मोहीम पूर्णत्वास जाईल, अशी शक्यता प्रशासनाकडून वर्तवण्यात आली आहे.



## ८ जुलैला ओढवला होता अनर्थ; कुटुंबीयांचा फुटला संयमाचा बांध

८ जुलै २०२६ रोजी दुपारी दीडच्या सुमारास हाहाकार उडाला, जेव्हा 'वेस्ट-टू-एनर्जी' (थर्रींश-ीं-एपशीसू) प्रकल्पाची ही तीन मजली प्रशासकीय इमारत पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली. या इमारतीखाली अनेक कामगार अडकले होते. सुरुवातीच्या टप्प्यात १४ कामगारांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. मात्र, त्यानंतरचे तास अत्यंत तणावपूर्ण होते. आज चौथ्या दिवशी घटनास्थळी अडकलेल्या कामगारांच्या नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती आणि त्यांच्या संयमाचा बांध फुटत चालला होता. आज सकाळी आणखी एका मजुराचा मृतदेह हाती लागल्याने मृतांची संख्या दोनवर पोहोचली. मात्र संध्याकाळच्या सुमारास बचावकार्याला मोठी गती मिळाली आणि ढिगाऱ्याखालून एकूण ५ जणांना बाहेर काढण्यात आले.

११ जुलैच्या या शोधमोहिमेत बाहेर काढण्यात आलेल्या कामगारांची नावे आता समोर आली आहेत. यामध्ये सुनील कोरके (वय ४०, रा. आळंदी), सन्नी माने (वय ३९, रा. गंधर्वनगरी, मोशी), महेश कुंभार (वय ३३, रा. छत्रपती संभाजीनगर) आणि नागेश गायकवाड (वय २६, रा. संजय गांधी नगर, मोशी) या चार जणांना जिवंत बाहेर काढण्यात आले आहे. या सर्वांना पिंपरी येथील वायसीएम रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. मात्र, अत्यंत दुर्दैवाची बाब म्हणजे या ५ जणांमध्ये बाहेर काढण्यात आलेला तरुण अक्षय सावंत याचा ढिगाऱ्याखाली दबून मृत्यू झाला आहे.

या संपूर्ण घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी थेट घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. या दुर्घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त करत त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना प्रकट केल्या. प्रसारमाध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यात साचलेला विषारी वायू आणि सततचा पाऊस यामुळे मदतकार्यात मोठे अडथळे येत आहेत. अद्याप बेपत्ता असलेल्या कामगाराचा शोध सुरू आहे.

## जागतिक धोकादायक ५० शहरांच्या यादीत पुणे, नागपूरचा समावेश

# उष्णतेच्या विळख्यात भारतातील १४ शहरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : शहरातील सतत वाढत्या तापमानामुळे जागतिक स्तरावर चिंता व्यक्त होत आहे. यात देशातील १४ शहरांचा समावेश असून महाराष्ट्रातील दोन प्रमुख शहरांचाही समावेश आहे. विशेष जगात उष्णतेचा धोका असलेल्या शहरांमध्ये राज्यातील दोन शहरे असून एक तर दिवसाच्या उष्णतेनंतर, सह्याद्रीच्या पर्वतरांगांमुळे संध्याकाळी थंड वाऱ्यामुळे आल्हाददायक वातावरणासाठी प्रसिद्ध आहे.जगातील २०५ सर्वात मोठ्या शहरांच्या विश्लेषणानुसार भारत,(खपवळर) पाकिस्तान,(झरज्ञळीींहरप) नायजेरिया आणि घाना या देशांमध्ये तीव्र उष्णतेच्या धोक्याची सर्वाधिक शहरे आहेत. सर्वाधिक धोकादायक ५० शहरांच्या यादीत जयपूरसारखी प्रमुख पर्यटनस्थळे आणि आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्रांचाही समावेश असल्याचे अभ्यासातून समोर आले आहे.

'सस्टेनेबल सिटीज अँड सोसायटी' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, तीव्र उष्णतेच्या धोक्याच्या दृष्टीने इराकमधील अल बसरा हे शहर जगात प्रथम, तर गुजरातमधील अहमदाबाद दुसऱ्या क्रमांकावर आहे. या अभ्यासात पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे नागरिकांना सर्वाधिक धोका असलेल्या शहरांची यादी तयार करण्यात आली आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या संशोधक व अभ्यासाच्या प्रमुख लेखिका नेथमी जयरत्ने करियावासम यांनी सांगितले की, लोकसंख्येची असुरक्षितता, मर्यादित आरोग्य सुविधा, आर्थिक परिस्थिती आणि उष्णतेशी सामना करण्याची कमी क्षमता यांसारखे घटकही धोका वाढवितात.

५० सर्वाधिक धोकादायक शहरांमध्ये भारतातील १४ शहरांचा समावेश असून, त्यात महाराष्ट्रातील नागपूर आणि पुणे, तामिळनाडूतील मदुराई आणि चेन्नई, कर्नाटकमधील बंगळुरू, तसेच उत्तर प्रदेशातील कानपूर आणि लखनौ यांचा समावेश आहे. सर्वाधिक धोक्याची ९५ टक्क्यांहून अधिक शहरे दक्षिण, आग्नेय आशिया आणि सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील आफ्रिकन प्रदेशात आहेत.

या अभ्यासात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांचे विश्लेषण करण्यात आले. नागरिकांचे वय, आर्थिक स्थिती, वातानुकूलन सुविधा, तसेच झाडे आणि हरित क्षेत्र यांसारख्या नैसर्गिक संरक्षण व्यवस्थेचा विचार करून उष्णतेच्या धोक्याचे मूल्यांकन करण्यात आले. या संशोधनाच्या सह-मार्गदर्शक आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सहयोगी प्राध्यापक राधिका खोसला यांनी सांगितले की, जगभरात वातानुकूलन यंत्रांच्या मागणीत वाढ होत असली तरी अनेकांना ती परवडत नाही. शिवाय, ऊर्जा वापरावर आधारित शीतकरण व्यवस्थेवर अतिनिर्भरता वाढल्यास जागतिक तापमानवाढ आणखी वेगाने होण्याचा धोका होऊ शकतो.



# दहा दिवसात पीक विम्याची रक्कम द्या, अन्यथा सरण आंदोलन

## तहसील कार्यालयात पीक विमा योजना तक्रार निवारण समिती बैठकीत शेतकऱ्यांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी ,,ज्या नुकसानीसाठी शासनाने पैसे दिले, त्याच नुकसानीसाठी विमा कंपनी 'नुकसान झालेच नाही' असे सांगत आहे. एकाच घटनेसाठी शासनाचे दोन वेगवेगळे निकष लावून शेतकऱ्यांवर दुहेरी अन्याय केला जात आहे त्यामुळे खरीप हंगामातील प्रलंबित पीकविमा दावे तात्काळ मंजूर करून रक्कम दहा दिवसाचे आता सबंधित शेतकऱ्यांच्या बँक खाती जमा करावी अन्यथा 'प्रधानमंत्री पीक विमा योजने'वर बहिष्कार टाकण्या बरोबरच सरणं आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा. तालुक्यातील देवगाव महसूल मंडळातील शेतकऱ्यांनी दिला आहे..

**नुकसान झालेल्या पिकांबाबत शासन आणि विमा कंपनी वेगवेगळे निकष लावून शेतकऱ्यांवर अन्याय करीत आ-हेत.त्यामुळे विमा कंपनीने जाचक अटी शिथिल करून शेतकरी हिताला प्राधान्य द्यावे.**

**– मनोहर बोचरे (शेतकरी देवगाव)**

निफाड येथे तहसील कार्यालयात पीक विमा तक्रार निवारण समितीची बैठक तहसीलदार विशाल नाईकवाडे यांचे अध्यक्षतेखाली व तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली .यावेळी पीकविमा योजनेबाबत शेतकऱ्यांनी तक्रारीचा पाढाच वाचला, सन २०२५ मधील खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे ९०टक्के पीक वाया गेल्यानंतरही प्रधानमंत्री पीक विमा कंपनीने उत्पन्नात घट नाही असे कारण देत शेतकऱ्यांचे सर्व दावे फेटाळल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त करीत तालुकास्तरीय पीक विमा तक्रार निवारण समितीच्या बैठकीत विमा कंपनीच्या कारभारा बाबत तीव्र आक्षेप घेत तक्रारींचा पाढा वाचला यावेळी. शेतकऱ्यांनी निवेदन देऊन दहा दिवसात पीक विमा मंजूर करण्याची मागणी केली. कारण देवगाव मंडळातील ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, मका, टोमॅटो सह इतर पिकांचे ९०टक्के नुकसान झाले. याबाबत ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहायक व ग्रामपंचायत अधिकारी यांनी संयुक्त शासकीय पंचनामे करीत ५३८७ शेतकऱ्यांच्या ३९७३,६७. हेक्टर बाधित क्षेत्रासाठी नैसर्गिक आपत्ती निधींतर्गत ३ कोटी ९२ लाख ४४ हजार ६५० रुपये इतकी मदत देखील वितरित केली आहे. मात्र शासनाने ज्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना पैसे दिले, त्याच नुकसानीसाठी विमा कंपनी 'नुकसान झालेच नाही' असे सांगत आहे. एकाच घटनेसाठी शासनाचे दोन वेगवेगळे निकष लावून शेतकऱ्यांवर दुहेरी अन्याय केला जात आहे .एकूणच पीक विमा कंपनीने प्रधानमंत्री विमा योजनेच्या मार्गदर्शक तत्व व नियमांचा भंग केला असल्याने पीक विमा कंपनीने दहा दिवसात पीक विम्याची रक्कम पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बँक खाती जमा करावी अन्यथा त्यानंतर विमा कंपनीच्या विरोधात सरणं आंदोलन छेडण्यात येईल अश्या वेळी होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील असा इशारा देखील यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी दिला आहे.

**देवगाव महसूल मंडळातील खरीप २०२५ मधील प्रलंबित विमा दावे मंजूर करण्यासंदर्भात व पीक विमा योजनेच्या जाचक अटी बदलण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासन स्तरावर पाठवण्यात येतील**

**– विशाल नाईकवाडे**
**तहसीलदार निफाड**



तर निर्भया महाराष्ट्र पार्टीचे जितेंद्र भावे म्हणाले की आम्हाला भीक नको परंतु आमच्या हक्काचा पीक विमा द्या . अश्या प्रकारच्या घोषणा देत उपस्थितांचे लक्ष वेधले.

याप्रसंगी निफाड पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊसाहेब बोचरे, देवगावचे माजी सरपंच विनोद जोशी,मनोहर बोचरे, बोचरे, धनंजय जोशी,,राजेंद्र मेमाणे,अनिल खडांगळे,रामेश्वर शिंदे ,राजेंद्र पाटील, प्रशांत कुलकर्णी, सुदाम रोटे, रामनाथ बडवर, किरण रोटे, शांताराम ढवळे, बाळासाहेब गुजर, निवृत्ती चव्हाणके, बापू तासकर, सुनिल तासकर यांचेसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री ग्राम समृद्धी अभियान अंतर्गत वागदरी येथे आरोग्य तपासणी संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस. के. गायकवाड): मुख्यमंत्री आरोग्य ग्रामसमृद्धी अभियाना अंतर्गत तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले असून या शिबिरात उत्स्फूर्तपणे ग्रामस्थांनी आरोग्य तपासणी करून घेतली.

राष्ट्राच्या विकासात्मक प्रक्रियेमध्ये शिक्षण,आरोग्य, आणि रोजगार हा महत्त्वाचा भाग असून या त्रिसूत्रीवर आधारित महाराष्ट्र शासनाने अनेक उपाययोजना केलेल्या असून शिक्षण रोजगार आणि आरोग्य यावर भर देऊन महाराष्ट्र शासन सध्या राज्यभर विविध योजना व अभियान राबविधाना दिसत आहे. त्याचाच भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री आरोग्य ग्राम समृद्धी अभियान सुरू केले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील वागदरी तालुका तुळजापूर येथील ग्रामपंचायतीने या अभियानामध्ये सहभाग घेतलेला ' आहे. त्या अनुषंगाने वेळोवेळी येथील ग्रामस्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य शिबिर घेतले जात आहे.

दि.११ जुलै २२६ रोजी आरोग्य समुदाय अधिकारी डॉ.यशवंत नरवडे खुदावाडी/ नळदुर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री आरोग्य ग्राम समृद्धी अभियानाअंतर्गत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

याप्रसंगी बोलताना डॉक्टर यशवंत नरवडे म्हणाले की आरोग्य हीच खरी संपत्ती असून वाढत्या वयाबरोबर गावातील ३० वर्षांपुढील स्त्री पुरुष यांनी आरोग्य तपासणी करून योग्य तो प्रथमोपचार व आरोग्य सल्ला घेणे गरजेचे आहे.या दृष्टीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये प्रामुख्याने ग्रामस्थ रुग्णांची रक्तदाब मधुमेह व अन्य आजाराबाबत तपासणी करून त्यांना प्रथम उपचार म्हणून औषय गोळ्या व आरोग्य सल्ला देण्याचे काम या शिबिराच्या माध्यमातून केले जात असून या शिबिरातून एखादा गंभीर आजारी रुग्ण निदर्शनास आल्यास त्याच्यावर प्रथम उपचार करून पुढील उपचारासाठी त्यांना मोफत आरोग्य सल्ला देण्यात येतो. तेव्हा वेळोवेळी ज्या ज्या वेळेस .या अभियाना अंतर्गत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात येईल त्या त्या वेळेस ग्रामस्थानी आपली आरोग्य तपासणी करून वेळीच प्रथम उपचार व आरोग्य सल्ला घेणे ही काळाची गरज आहे.

या आरोग्य तपासणी शिबिरास येथील ग्रामस्थांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला असून अनेक स्त्री-पुरुषांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

यावेळीआरोग्य तपासणीचे काम डॉ.यशवंत नरवडे,आरोग्य सेवक आर.बी. हवालदार अशा कार्यकर्ते पार्वती बिराजदार यांनी काम पाहिले.

या अभियानाबाबत येथील ग्रामस्थानी व रुग्णनी समाधान व्यक्त केले

# युवा शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध केल्यास देशाचा सर्वांगीण विकास होईल : डॉ. राजीव प्रधान




जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ राजीव प्रधान तर व्यासपीठावर इतर मान्यवर दिसत आहेत.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भारतामध्ये तरुणांची संख्या मोठी असून हीच देशाची खरी ताकद आहे. या युवा शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्यास देशाचा सर्वांगीण विकास साधता येईल. लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजन, महिलांचे शिक्षण, महिला सक्षमीकरण, योग्य विवाहाचे वय, मातृ व बाल आरोग्य, लसीकरण, संतुलित आहार आणि प्रजनन आरोग्याविषयी जागरूकता अत्यंत आवश्यक आहे. समाजामध्ये अंधश्रद्धा, गैरसमज आणि चुकीच्या समजुती दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन डॉ. राजीव प्रधान यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (एफपीए इंडिया), सोलापूर शाखा व ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त जनजागृतीपर प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुर्ला महाविद्यालयाचे डॉ. शिवानंद भांजे हे होते. यावेळी व्यासपीठावर एफ. पी. ए. आय. सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. नी जॉन, युवाप्रतिनिधी ऐश्वर्या सावंत आदी उपस्थित होते .

पुढे बोलताना डॉ. प्रधान म्हणाले की,११ जुलै हा दिवस केवळ लोकसंख्या वाढीचा विचार करण्यासाठी नसून, लोकसंख्येची गुणवत्ता, आरोग्य, शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा विचार करण्याचा दिवस आहे. वाढती लोकसंख्या ही देशाच्या विकासासाठी संधी असली तरी तिचे योग्य नियोजन न झाल्यास अन्नसुरक्षा, पिण्याचे पाणी, ऊर्जा, आरोग्य सेवा, शिक्षण, रोजगार, निवारा आणि पर्यावरणावर मोठा ताण निर्माण होतो. त्यामुळे उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. डॉ. शंकर राजे यांनी प्रास्ताविक करून जागतिक लोकसंख्या दिनाचे महत्त्व, उद्दिष्टे आणि कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. स्वागत कल्पना गडगडे यांनी केले. सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी केले तर आभार ऐश्वर्या सावंत यांनी मानले.

कार्यक्रमास बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे कर्मचारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोका गुन्ह्यातून जामीनवर सुटलेला आरोपी जेरबंद; गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीणची कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ठाणे पुणे सकाळ सोलापूर ग्रामीण ची कामगिरी मोका गुन्हायातुन जामीन वर सुटलेला आरोपी जेरबंद दोन जबरी चोरी, दोन घरपोळ्या, व एक मोटर सायकल चोरी असे एकूण पाच गुणी उघड केस आणून १६.५ ग्रॅम सोने, १५ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने व रोख रक्कम मोटरसायकलचा ३.१३९, ७५०/ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

मा. पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण श्री अतुल कुलकर्णी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय जगताप यांना सोलापूर ग्रामीण जिल्ह्यामध्ये माला विषयी गुन्ह्यांची कौल करणे कामी व रेकॉर्डवरील पाहिजे फरारी आरोपींचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत अधिक्षित केले होते त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री संजय जगताप यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव वाघ व त्यांचे पथकास माला विषयी गुन्ह्यांची उकल व पाहिजे फरारी आरोपी जेरबंद करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.



त्याप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव वाघ व त्यांचे पथक माला विषयी गुन्ह्यांची उखल करण्याकामी व फरारी आरोपींना शोध घेण्याकरिता मंद्रूप पोलिस ठाणे हद्दीत हजर असताना पथकातील पोलिसांबलदार अक्षय डोंगरे यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मोठ्या मधून जामीन वर सुटलेला आरोपी नामे सागर सफाल्या शिंदे व त्याचा सावत्र भाऊ व त्याचा आणखीन एक साथीदार असे तिघांनी मिळून मनगोळी व दक्षिण सोलापूर येथील वस्तीवरील वयोवृद्ध महिलेस जीवे मारण्याची धमकी देऊन तिचे गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने जबरीने चोरले असून ते दोघे संध्या अत्रोळी फाटा येथे चोरीचे मोटरसायकलसह थांबलेले आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, सदरची बातमी मा. पोलीस निरीक्षक श्री संजय जगताप, व स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण यांना कळविले असता त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघ यांना कारवाई करण्याबाबत आदेश दिले.

साहेब पोलीस निरीक्षक ज्ञानदेव वाघ व त्यांचे पथक मंजूर वेतन निघून बातमी प्रमाणे मौजे अक्रोळी फाटा व दक्षिण सोलापूर येथे आले असता तेथे बातमी प्रमाणे दोन इसम हे मोटरसायकल सह थांबलेले दिसून आले, व त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे नाव व पत्ता विचारता हे उडवाळीचे उत्तरे देऊ लागले, व त्यांना साहेब पोलीस ज्ञानदेव वाघ यांनी विश्वासात घेऊन पोलीस असल्याचे सांगून त्यांचे नाव व पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे १) सागर उर्फ सागर या सप्रे उर्फ संपल्या शिंदे वय २९ वर्षे असा त्याचा सावत्र भाऊ असलेला विधी संघर्ष ग्रस्त बालक दोघे राहणार जामगाव तालुका मोहोळ असे असल्याचे सांगितले त्याकडे मिळालेल्या बातमीप्रमाणे कौशल्यपूर्ण तपास करत त्यांनी मागील १५ ते २० दिवसांपूर्वी मनगोळी शिवारात एका वस्तीवर वयोवृद्ध महिलेस जीवे मानेची धमकी देऊन तिची गळातील व कानातील सोन्याचे दागिने जबरीने चोरले असल्याचे सांगितले व पकडलेले आरोपी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याने त्यांच्याकडे अधिक तपास असता त्यांनी दामाजी कारखाना रोड मंगळवेढा येथे घरातील महिलेस व मुलास दाग दाखवून लुटलेचे सांगून कांदलगाव तालुका दक्षिण सोलापूर हराळवाडी तालुका मोहोळ येथे एकाच रात्री पाच घरपोळ्याचे सांगून त्यांचे ताब्यात मिळून आलेली युनिकॉर्न मोटरसायकल ही शिवाजी मगर बाळे इथून चोरून आणल्याचे सांगितले त्यांच्याकडून पुण्यातील चोरी सासलेल्या मुद्देमाला पैकी १६.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व पंधरा ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, व एक युनि कॉर्न मोटरसायकल व रोख रक्कम असा एकूण ३,२९,७५०/ रुपये बाजार मूल्य भावाप्रमाणे किमतीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे पकडलेली आरोपी हे रेकॉर्ड वरील शाळेत गुन्हेगार असून त्यांच्याकडे अधिक तपास चालू असून आणखीन गुन्हे उघडली देण्याची शक्यता आहे पकडलेल्या विधी संघर्षग्रस्त बालक व एकूण १६ विविध घरपोळ्यांच्या गुन्ह्यात रेकॉर्डवरील पाहिजे असा सागर शिंदे हा कामठी पोस्ट बोर नंबर ६६/२०२४ भावली कलम ३२६ तसेच मंद्रूप पोस्ट २६८/२०१८ भादवि कलम ३७९ मध्ये पाहिजे असलेला आरोपी आहे मोहोळ पोस्टकडील गुरु नंबर १३२/२०१८ भादवि कलम ३०२ मध्ये नॉन बेलेबल वॉरंट प्रलंबित आहे. तो सध्या मंगळवेढा तालुक्यातील छोटी या गावातील सन २०१८ मधील कुणाचं दरोडा येथील मोका मधून जामीनवर सुटलेला आरोपी आहे त्याच्याकडून उघडकीस आलेल्या गुन्ह्यांची माहिती खालील प्रमाणे.

आ.क, पोलीस ठाणे घोर नंबर व कलम

१) मुद्दू पोलीस ठाणे २४५/२०२६ बी एन एस ३०९ (६) ३२४ (४),३(५)

२) मंगळवेढा पोलीस ठाणे १६८/२०२६ बीएनएस ३०९ (४),३(५)

३) बुद्रुक पोलीस ठाणे २५२/२०२६ बी एन एस ३३१ (४) ३०५ (अ),३(५)

४) कामती पोलीस ठाणे १४७/२०२६ बी एन एस ३३१ (४) ३०५ (अ),३(५)

५) फौजदार चवळी पोलीस ठाणे ४२५/२०२६ बीएनएस ३०३ (२)

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सर्व शासकीय यंत्रणांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ साठीचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत : पालकमंत्री जयकुमार गोरे

**■ पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा वार्षिक योजना २०२५ -२६ च्या ९३५ कोटीच्या खर्चास मान्यता, तर सन २०२६-२७ जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत ८४२ कोटीचा प्रारूप आराखडा मंजूर**

**■ जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ चा १००% मान्यता, १००% खर्च असे सर्वोत्तम काम केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांच्यासह सर्व शासकीय विभाग प्रमुखांचे पालकमंत्री यांच्याकडून कौतुक**





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हा नियोजन समितीने जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ सर्वसाधारण अंतर्गत चा ८४२ कोटीचा प्रारूप आराखडा मंजूर केलेला आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी मंजूर केलेला निधी अंतर्गतची कामांचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. विभाग प्रमुखांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर करण्यात आलेला निधी ज्या कामासाठी मंजूर केला आहे त्याच कामावर शंभर टक्के खर्च करावा, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

नियोजन भवन येथील समिती सभागृहात

आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, महापौर विनायक कोंड्याल, खासदार प्रा. ज्योती वाघमारे, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार प्रणिती शिंदे, जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, महापालिका डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, प्रीतम कुंटला यांच्या सह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की जिल्हा वार्षिक योजना सन २०२५- २६ अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्यासह नियोजन समितीचे सर्व अधिकारी यांनी समितीकडून १००% मान्यता दिलेला निधी खर्चही १००% केलेला आहे. जिल्हा नियोजन समितीचे हे सर्वोत्तम काम असून हे काम केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांच्यासह सर्व विभाग प्रमुखाचे कौतुक आहे. तसेच पालकमंत्री कार्यालयाकडून कामे पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे विशेष कार्य अधिकारी श्री. महादेव घुले यांच्या ही कामाची त्यांनी प्रशंसा केली. असेच काम जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ मध्ये झाले पाहिजे, यासाठी सर्व यंत्रणा प्रमुखांनी त्यांच्या विभागांना मंजूर केलेला निधी अंतर्गतच्या कामाचे प्रस्ताव तात्काळ समितीला सादर करून त्याच्या मान्यता घ्याव्यात व तो निधी विहित काल मर्यादापूर्वी मंजूर कामावर १००% खर्च करण्याचे काटेकोरपणे नियोजन करावे ,असे त्यांनी निर्देशित केले.

आपल्या सोलापूर जिल्ह्यात पाऊस अत्यंत कमी झालेला आहे त्यामुळे शेतकरी व नागरिकांनी पाणी अत्यंत जपून वापरले पाहिजे. सद्यस्थितीत पिण्याच्या पाण्याला अधिक महत्त्व दिले आहे. शेतकऱ्यांच्या शेती पंपाला वीज पुरवठा दोन तासात केला जात होता, परंतु शेतकरी बांधवांची मागणी लक्षात घेऊन आता दररोज पाच तास शेती पंपाला वीज पुरवठा देण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण वाढल्यानंतर वीजपुरवठा आणखी सुरळीत करण्यात येईल, असेही पालकमंत्री श्री. गोरे यांनी यावेळी सांगितले.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दि. ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीतील इतिवृत्तास अनुसरून केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालास मान्यता दिली. त्यानुसार जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ (सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) दि. ३१ मार्च, २०२६ अखेरच्या खर्चास मान्यता देण्यात आली. सन २०२६-२७ साठी ८४२ कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी देण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी पालकमंत्री महोदय व लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे सर्व संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ सर्वसाधारण योजनेसाठी दि. ३१ मार्च २०२६ अखेर ७८३ कोटी रुपयांची तरतूद होती. या तरतुदीइतकाच म्हणजे ७८३ कोटी रुपये खर्च झाल्यामुळे खर्चाची टक्केवारी १००% नोंदवण्यात आली. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १५१ कोटी तरतूद होती, या उपयोजनेसाठी १५१ कोटी रुपये खर्च झाले असून खर्च १००% झाले. आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेसाठी ४ कोटी ६४ लाख ५१ हजार तरतूद होती व ४ कोटी ५३ लाख ६५ जात रुपये खर्च झाला. त्यामुळे खर्चाची टक्केवारी ९९.८३% इतकी नोंदवण्यात आली. एकूण तरतूद ९३५ कोटी ४४ लाख ५१ हजार रुपये इतकी असून एकूण खर्च १००% झालेला आहे, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी बैठकीत दिली.

त्याचप्रमाणे जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ च्या कामांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली. या आराखड्यासाठी शासनाकडून एकूण ६९३.९० कोटींची मर्यादा कळविण्यात आली होती. राज्यस्तरीय बैठकीत नागरी भागासाठी विशेष अतिरिक्त नियतव्यय ८०.२६ कोटी रुपये कळविण्यात आले. तसेच जिल्ह्यातील अक्कलकोट व सांगोला या दोन आकांक्षित तालुक्यांसाठी १०.०० कोटी रुपये समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे एकूण अंतिम नियतव्यय ८४२ कोटी रुपये इतका हसून या समितीने मान्यता देण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर, आमदार राजेंद्र राऊत,आमदार समाधान आवताडे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार नारायण पाटील, आमदार राजू खरे यांनी बैठकीमध्ये विविध सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडून ते सोडवण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी तातडीने काम करण्याची मागणी केली.

# आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर आगारात पाच नवीन 'राजमाता जिजाऊ' बस दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी : आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातून पंढरपूरकडे येणाऱ्या भाविकांच्या वाहतूक सुविधेला बळकटी देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पंढरपूर आगारात पाच नवीन राजमाता जिजाऊ बस दाखल झाल्या आहेत. या नवीन बसचे लोकार्पण पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी आमदार समाधान आवताडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसमवेत एसटीतून प्रवास केला.

## आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते लोकार्पण

यावेळी पंढरपूर पंचायत समितीचे सभापती शुभम आगावणे, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, आधार प्रमुख योगेश लिंगायत, विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, सांगोला स्थानक प्रमुख पंकज तोंडे, नगरसेवक संजय बंदपट्टे, माजी नगरसेवक किरणराज घाडगे, लखन चौगुले, विनोद लटके, द्रोणाचार्य हाके, विनोद सुरवसे, बशीर तांबोळी, आमीन शेख यांच्यासह एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार समाधान आवताडे यांनी आषाढी यात्रेदरम्यान लाखो भाविक पंढरपूरमध्ये दाखल होत असल्याने सुरक्षित, आरामदायी आणि वेळेवर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे ही एसटी महामंडळाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे सांगितले. नव्याने दाखल झालेल्या पाच राजमाता जिजाऊ बसमुळे यात्रेच्या काळात प्रवाशांना अधिक चांगली सेवा मिळेल, तसेच पंढरपूर आगाराची वाहतूक क्षमता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आषाढी यात्रेत पंढरपूरकडे जाणाऱ्या विविध मार्गांवर अतिरिक्त बससेवा सुरू करण्यात येत असून नव्याने दाखल झालेल्या एसटी बसेसमुळे भाविकांची आणि स्थानिक नागरिकांची सोय होणार आहे. यात्रेदरम्यान वाढणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने आवश्यक नियोजन केले असून या बस त्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. याचबरोबर स्थानिक नागरिकांची ही सोय होणार आहे.

# कळंब तालुक्यात सोयाबीन पिकावर शंखी गोगलगाईचा धोका, कृषी विभागाचे शेतकऱ्यांना तातडीचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : खरीप हंगाम सुरू झाला असून तालुक्यात सोयाबीनची पेरणी व उगवण पूर्ण झाली आहे. सध्या सोयाबीन पिके रोपावस्थेत असून या काळात शंखी गोगलगाईचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. ही कीड रात्रीच्या वेळी सक्रिय होऊन कोवळी रोपे खाते आणि मोठे नुकसान करते. यामुळे शेतकऱ्यांनी वेळीच नियंत्रणाचे उपाय करावेत, असे आवाहन कळंब तालुका कृषी अधिकारी श्री.भागवत सरडे यांनी केले आहे.

गोगलगाईचे नियंत्रण करण्यासाठी उन्हाळ्यात शेताची खोल नांगरट करणे आवश्यक आहे. त्यामुळे जमिनीत लपलेल्या गोगलगाई कडक उन्हामुळे नष्ट होतात. सोयाबीन पेरणीनंतर बांधाच्या आतल्या बाजूने ५ सेंटीमीटर रुंदीचा चुन्याचा पट्टा मारावा. यामुळे गोगलगाई शेतात प्रवेश करू शकत नाहीत. तसेच मेटालडिहाईड २.५ टक्के असलेले 'स्नेलकील' या औषधाचे बारीक गोळे करून बांधाच्या आतल्या बाजूने संपूर्ण शेताभोवती ५ फूट अंतरावर एक एक गोळी टाकावी. या गोळ्यांना गोगलगाई आकर्षित होते. आणि गोळी खाल्ल्यानंतर ४ ते ५ तासांत त्या मरतात.

उगवणीनंतर शेतात गोगलगाईचा प्रादुर्भाव दिसून आल्यास प्रत्येक चार ओळींनंतर ओळीच्या बाजूने ५ फूट अंतरावर स्नेलकीलच्या गोळ्या टाकाव्यात. रोपावस्थेत रात्रीच्या वेळी प्रति एकरी १०ठिकाणी ओल्या गव्हाचे ढीग किंवा पाण्यात भिजवलेली पोती ठेवावीत. सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान त्याखाली जमा झालेल्या गोगलगाई गोळा करून त्या साबणाच्या किंवा मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात.

गोगलगाईचे कायमस्वरूपी नियंत्रण व्हावे यासाठी संपूर्ण गावात किंवा परिसरात सामूहिक मोहीम राबवणे गरजेचे आहे, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी शेतकऱ्यांनी आपल्या भागातील सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन तालुका कृषी अधिकारी श्री भागवत सरडे यांनी केले आहे.

## भिवंडी आगाराच्या खडवली - पडघा फेरीतील घटना

# खडवली येथे बसला भीषण आग; रिक्षाचालकाच्या सतर्कतेमुळे ३० ते ३५ प्रवाशांचे वाचले प्राण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : भिवंडी आगाराच्या पडघा- खडवली या नियमित फेरीवरील एसटी बसला शनिवारी (दि. ११) सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास खडवली येथे अचानक भीषण आग लागल्याने काही मिनिटांतच संपूर्ण बस जळून खाक झाली. मात्र, स्थानिक रिक्षाचालक शैलेश जाधव यांच्या सतर्कतेमुळे बसचालकाला वेळेत आग लागल्याची माहिती मिळाली. त्यामुळे बसमधील सुमारे ३० ते ३५ प्रवाशांना तातडीने सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आणि संभाव्य मोठी दुर्घटना टळली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

## काही मिनिटांत बस जळून खाक, जीवितहानी टळली; शैलेश जाधव यांच्या प्रसंगावधानाचे सर्वत्र कौतुक

मिळालेल्या माहितीनुसार, खडवली-पडघा या सायंकाळी ६ वाजताच्या नियमित फेरीवरील एसटी बस खडवली परिसरातून जात असताना रिक्षाचालक शैलेश जाधव यांच्या निदर्शनास बसच्या पुढील भागातून धूर व आगीच्या ज्वाळा दिसल्या. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तात्काळ बसचालकाला गाडीला आग लागल्याची सूचना दिली. बसचालकानेही प्रसंगावधान राखत बस तातडीने थांबवली. दोन्ही दरवाज्यांतून सर्व प्रवाशांना त्वरित खाली उतरवले. प्रवासी सुरक्षित बाहेर पडताच काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बसला वेढा घातला..बसमध्ये उपलब्ध असलेल्या अग्निशामक यंत्राच्या सहाय्याने बसचालकाने आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आग वेगाने पसरल्याने त्याचा काहीही उपयोग झाला नाही. काही मिनिटांतच संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. घटनेनंतर परिसरात धुराचे मोठे लोट पसरल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी पाण्याच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच कल्याण येथून अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. मात्र, तोपर्यंत बस पूर्णपणे जळून खाक झाली होती. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी एसटी बसचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे. प्राथमिक अंदाजानुसार बसच्या इंजिन विभागात तांत्रिक बिघाड झाल्याने आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तपासानंतरच याबाबतचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे..या घटनेत वेळीच सतर्कता दाखवून बसचालकाला सूचना देणारे रिक्षाचालक शैलेश जाधव हे संभाव्य मोठी दुर्घटना टाळण्यात महत्त्वाचे ठरले. त्यांच्या धाडसाचे आणि प्रसंगावधानाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.





**बसच्या पुढील भागातून धूर आणि आग दिसताच मी तात्काळ बसचालकाला गाडीला आग लागल्याची सूचना दिली आणि सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यास सांगितले. वेळेत सूचना दिल्यामुळे मोठी दुर्घटना टळली, याचे समाधान वाटते.**

**- शैलेश जाधव रिक्षाचालक, खडवली**

**मी खडवली-पडघा या बसमधून प्रवास करत होते. बसला आग लागताच प्रवाशांमध्ये मोठी घबराट पसरली. त्या गोंधळात मी एका लहान बाळाला सुरक्षित बाहेर काढले. मात्र, अशा प्रसंगी बसचालक व संबंधित यंत्रणेने अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे.**

**- कंचन कुंभार प्रवासी, पडघा**

# स्वेरीच्या पाच विद्यार्थ्यांची 'एरोसिस एचव्हीएसी प्रा.लि.' या नामांकित कंपनीत निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'एरोसिस एचव्हीएसी प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील पाच विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांनी दिली.




'एरोसिस एचव्हीएसी प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील अक्षता लक्ष्मण खताळ, प्रतिक्षा नवनाथ चौगुले, आदित्य गिरीश पवार, माऊली संजय गोरे व संकेत संतोष मगर या पाच विद्यार्थ्यांची निवड केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी वार्षिक रुपये चार लाखांचे पॅकेज मिळाले आहे. ही कंपनी प्रामुख्याने एचव्हीएसी या क्षेत्रात कार्यरत आहे. एचव्हीएसी हे एक विशेष कार्यक्षेत्र आहे, त्याचा उपयोग फार्मसी, दवाखाने, मेकॅनिकल आणि इतर बऱ्याच विभागात होतो. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. गेल्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून नोकरीच्या ४७३ पेक्षा जास्त संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मधील व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून 'एरोसिस एचव्हीएसी प्रायव्हेट लिमिटेड'या कंपनीत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शै. वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्लेसमेंटद्वारे नोकरीच्या तब्बल ४७३ पेक्षा जास्त संधी

## स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या विद्यार्थ्यांना

**शै. वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्लेसमेंटद्वारे नोकरीच्या तब्बल ४७३ पेक्षा जास्त संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. अजूनही कांही कंपन्यांचे रिझल्ट्स येणे बाकी आहे. विद्यार्थ्यांची चिकाटी, स्वेरीची आदरयुक्त शिक्षणसंस्कृती, रात्र अभ्यासिका, विद्यार्थ्यांना दिले जाणारे विविध प्रकारचे प्रशिक्षण आदी बाबींचा एकत्रित परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये होणारी निवड होय.**

# उद्योगस्नेही धोरण व दर्जेदार पायाभूत सुविधांसाठी शासन कटिबद्ध; एमआयडीसीतील निष्क्रिय भूखंड काढून घेणार : उद्योग मंत्री उदय सामंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील उद्योगाला चालना मिळावी यासाठी उद्योग विभागाच्या वतीने उद्योग स्नेही धोरण राबवण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व एमआयडीसीमध्ये उद्योजकांनी चांगले उद्योग उभा करून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करावा यासाठी उद्योग विभागाच्या वतीने एमआयडीसीमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले.

शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात सोलापूर जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटना समवेत आयोजित आढावा बैठकीत उद्योग मंत्री डॉ. सामंत मार्गदर्शन करत होते. यावेळी खासदार प्रा. ज्योतीताई वाघमारे, आमदार राजू खरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र उमेशचंद्र दंडगव्हाळ, प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी शिवाजी राठोड, यंत्रमाग संघ डायरेक्टर नारायण आडकी, उपाध्यक्ष टेक्सटाईल फाउंडेशन जयंत श्रीअकेन, व्यवस्थापक सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन एस. बी. गायकवाड, इंडस्ट्रियल असोसिएशनचे शिवशंकर आंधळकर इत्यादी उद्योजक व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की, सोलापूरमधील ड्रायपोर्ट उद्योग हा अत्यंत महत्त्वाचा असून त्यासाठी एमआयडीसीमध्ये राखीव भूखंड देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच चिंचोली एमआयडीसीसाठी वाढीव ५ एमएलडी पाणी देण्याबाबत महापालिका आयुक्त यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासाठी महापालिकेला दोन वर्षात २८ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. त्यापैकी येत्या दोन-चार दिवसात ७ कोटी रुपये दिले जाणार आहेत, अक्कलकोट रोड एमआयडीसीसाठी आवश्यक तेवढा पाण्याचा पुरवठा करण्याबाबतही निर्देश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योजकांनी अंतर्गत रस्ते, वीज, सांडपाणी तसेच अग्निशमन या समस्यांबाबत मांडलेल्या अडीअडचणी सोडवण्याबाबत संबंधित विभागांना सूचना दिल्या. तसेच जलसंपदा विभाग, महापालिका, प्रदूषण मंडळ, वनविभाग यांची जिल्हाधिकारी यांनी बैठक घेऊन कुंभारी-एमआयडीसी रस्त्याबाबतचा प्रश्न मार्गी लावावा, अशा सूचना उद्योग मंत्री डॉक्टर सामंत यांनी दिल्या. क्लस्टर मानांकनाच्या बाबतीत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना सूचना देण्यात आल्या. तसेच एमआयडीसीच्या जागेमध्ये भूखंड घेऊन जर कोणी उद्योग सुरू करत नसेल तर ते भूखंड त्यांच्याकडून काढून घ्यावेत, असे निर्देश दिले. एमआयडीसी लगतच्या ग्रामपंचायतींना उद्योजकांच्या करातील ५० टक्के रक्कम ही त्या ग्रामपंचायतीच्या कामासाठी देण्यात येईल. मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ते काम योग्य असल्याचा दाखला दिल्यानंतरच तेच काम ग्रामपंचायतीने करावे, असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. सोलापूरात ड्रायपोर्टसाठी जागेची मागणी होती. त्यामुळे औद्योगिक वसाहतीमध्ये १०० एकर जागा देण्याची आमची तयारी आहे. तसेच औद्योगिक वसाहतीला ५ एमएलडी पाणी देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज सोलापूर येथील उद्योजकांसोबत संवाद साधला. यावेळी उद्योजकांनी आपल्या समस्या आणि अडचणी मंत्री सामंत यांच्यासमोर मांडल्या. उद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

---

## टाकळीवाडीतील गणेशमूर्ती प्रसिद्ध विविध रूपातील मूर्तींना भाविकांची पसंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : शिरोळ तालुक्यातील टाकळीवाडी येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध आकार आणि आकर्षक रूपांतील गणेशमूर्ती विक्रीसाठी उपलब्ध झाल्या असून भाविकांकडून त्यांना मोठी पसंती मिळत आहे. एक फूट उंचीच्या घरगुती गणेशमूर्तींपासून ते बारा फूट उंचीच्या सार्वजनिक मंडळांसाठीच्या भव्य गणेशमूर्तींपर्यंत विविध प्रकारच्या मूर्ती ग्राहकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत.



**एक फुटापासून ते बारा फुटापर्यंत आकर्षक मूर्ती**

पारंपरिक, राजेशाही, बालगणेश, शिवरूप, विठ्ठलरूप तसेच आधुनिक कलाकुसरीने साकारलेल्या गणेशमूर्ती यंदा विशेष आकर्षण ठरत आहेत. कुशल कारागिरांनी अत्यंत बारकाईने तयार केलेल्या या मूर्तींमुळे गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पूर्वीपासूनच कर्नाटकातील चिकोडी तालुका, महाराष्ट्रातील शिरोळ तालुका मध्ये टाकळीवाडीचे गणेश मूर्ती प्रसिद्ध आहेत. भरपूर मागणी सुद्धा आहे.

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने गणेशमूर्ती खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढू लागली आहे. ग्राहकांच्या आवडीनुसार विविध आकार, रंगसंगती आणि आकर्षक डिझाइनमधील मूर्ती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. टाकळीवाडीतील गणेशमूर्तींची गुणवत्ता, देखणेपणा आणि वैशिष्ट्यपूर्ण कलाकुसर यामुळे परिसरासह बाहेरील गावांतील भाविकही येथे खरेदीसाठी येत असून यंदाही येथील गणेशमूर्ती विशेष चर्चेचा विषय ठरत आहेत.

---

## जि. प.तांदुळवाडी शाळेत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी श्री सुहास धाबेकर तर उपाध्यक्षपदी अश्विनी भालेकर यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील तांदुळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची नुकतीच निवड करण्यात आली.शैक्षणिक वर्ष.२०२६-२७ व २७-२८, साठी झालेल्या शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडीमध्ये अध्यक्ष म्हणून श्री सुहास धावेकर यांची तर, उपाध्यक्षपदी श्रीमती अश्विनी भालेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली . शालेय व्यवस्थापन समितीचे मावळते अध्यक्ष श्री माधवराव पाटील व उपाध्यक्ष श्री जुबेर गणी पठाण यांच्यासह शालेय समितीचे सर्व मागील सदस्य



आणि शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने यावेळी शाळेत उपस्थित होते. उपस्थित सदस्यांमधून शालेय समितीसाठी आठ सदस्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. त्यानंतर सदस्यांमधून शालेय समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली . शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे महत्त्व, समितीच्या सदस्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य याबाबत शाळेचे मुख्याध्यापक श्री. संतोष भोजने यांनी उपस्थितांना सविस्तर असे मार्गदर्शन केले. सर्व घटकांना सोबत घेऊन शाळेचा आणि गावचा विकास साधण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीने काम करावे असे सांगितले. शाळेच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा विषयक त्याचबरोबर विविध सहशालेय उपक्रमांमध्ये शालेय व्यवस्थापन समितीची महत्त्वपूर्ण जबाबदारी असल्याबाबत त्यांनी सांगितले. यापुढे सर्वांनी नियमित बैठकाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे ठरले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री संतोष मोहिते, श्रीमती आशा पवार, रसिका आगरकर श्री सयाजी शिंदे इत्यादी सहशिक्षकांनी सहकार्य केले. सभेसाठी शिवकुमार नारकर, सुहास धाबेकर,ज्ञानेश्वर डिकले, संजीवनी लिमकर,श्रीरंग काळे, अश्विनी भालेकर,सुजाता कदम,नितीन काळे, प्रताप काळे,प्रगती माने, अश्रुबा राऊत, जनाबाई चाळक, गवळण काळे, अश्विनी काळे, सुनील काळे,सरस्वती डिकले, अंकिता भालेकर,शीला कोल्हे, मंदाकिनी खोसे, प्रतिभा काळे, संदीप डिकले, सचिन देवकर, सरिता काळे, संतोष पोळ यांच्यासह पालक उपस्थित होते.

---

## अनेक वर्षांचा 'रस्ता कोंडी'चा प्रश्न अखेर मिटला!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेला खडक माळेगांव - खानगाव नजीक येथील शिवरस्ता अखेर आज, दिनांक १० जुलै २०२६ रोजी प्रशासकीय कारवाई आणि शेतकऱ्यांच्या अभूतपूर्व सहकार्यामुळे मोकळा करण्यात आला आहे. या रस्त्यावरील लोखंडी अँगल (अडथळे) काढून सुमारे २ ते अडीच किलोमीटरचा रस्ता पूर्णपणे खुला करण्यात आला. वर्षानुवर्षांचा हा अडसर दूर झाल्यामुळे परिसरातील २०० ते २५० शेतकरी खातेदारांना याचा थेट लाभ मिळणार असून, त्यांच्या शेतमालाच्या वाहतुकीचा प्रश्न कायमचा सुटला आहे.

**शेतकऱ्यांचे सहकार्य आणि प्रशासकीय तत्परता**

हा रस्ता खुला करण्यासाठी स्थानिक शेतकरी खातेदारांनी प्रशासनाला अत्यंत मोलाचे सहकार्य केले. कोणत्याही वादाविना, सामंजस्याने हा प्रश्न मार्गी लावण्यात आला. रस्ता मोकळा करण्याच्या या महत्त्वपूर्ण मोहिमेत

**खडक माळेगाव खानगाव नजीकचा शिवरस्ता मोकळा; २५० शेतकऱ्यांना मोठा दिलासा**

महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उपस्थित प्रमुख अधिकारी व प्रतिनिधी:**

महसूल विभाग: लासलगावच्या मंडळाधिकारी रूपाली सावळे, खडक माळेगावचे ग्राममहसूल अधिकारी जनार्दन उशीर आणि महसूल सेवक जयश्री पवार.

पोलीस प्रशासन: पोलीस कर्मचारी गोसावी आणि पोलीस कर्मचारी कांदळकर.

स्थानिक नेतृत्व: पोलीस पाटील वैशाली बाजारे, पोलीस पाटील शंकर वाघ आणि तंटामुक्ती अध्यक्ष संदीप गारे.

याप्रसंगी परिसरातील इतर शेतकरी खातेदारही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वर्षानुवर्षांची पायपीट थांबणार; शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण**

हा शिवरस्ता बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी आणि शेतीमाल बाजारपेठेत नेण्यासाठी मोठा वळसा घालावा लागत होता. आज २ ते २.५ किलोमीटरचा हा मार्ग मोकळा झाल्याने २५० शेतकरी कुटुंबांची मोठी सोय झाली आहे. अनेक वर्षांचा हा प्रलंबित प्रश्न अत्यंत शांततेत आणि यशस्वीपणे सुटल्यामुळे सर्वच स्तरांतून महसूल प्रशासन, पोलीस दल आणि स्थानिक शेतकऱ्यांचे कौतुक होत आहे.



मान्यवरांची होती उपस्थिती

---

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन**

## 'मुरबाडमध्य'आई महोत्सव, मातृशक्ती गौरव व गुणवंत विद्यार्थी सत्कार' उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुरबाड प्रतिनिधी/विजय घनघाव / प्रफुल्ल शेवाळे : प्रियजन गुणवगौरव समिती, मुरबाड आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, ठाणे जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आई महोत्सव, मातृशक्ती गौरव व गुणवंत विद्यार्थी सत्कार' सोहळा शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमास महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजितदादा पवार प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उपस्थित माता-भगिनी, गुणवंत विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांना संबोधित करताना आईचे समाजातील अनन्यसाधारण स्थान अधोरेखित केले. आई ही प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार असून तिचे संस्कार, त्याग आणि कष्ट यांच्यामुळेच समाजात अनेक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वे घडतात. मातृशक्तीचा सन्मान हा आपल्या संस्कृतीचा आणि समाजाचा अभिमान आहे, असे त्या म्हणाल्या.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या मेहनतीबरोबरच आई-वडिलांचे संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबाचा मोलाचा वाटा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांचा सन्मान म्हणजे उद्याच्या महाराष्ट्राचा सन्मान असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांचा उल्लेख करत 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक', मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, पिंक ई-रिक्षा योजना, स्वयंरोजगार, शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमुळे महिलांना अधिक सक्षम बनविण्याचे काम शासन करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. प्रमोद हिंदुराव यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, आई ही प्रत्येकाच्या आयुष्यातील पहिली गुरु असून तिच्या संस्कारातूनच समाजाला सक्षम नागरिक मिळतात. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव हा भविष्यातील सक्षम महाराष्ट्र घडविण्याचा पाया आहे.

यावेळी त्यांनी कल्याण परिसरातील वरप, कांबा आणि म्हारळ येथे शासकीय जागेवर सुसज्ज क्रिकेट स्टेडियम उभारण्याची तसेच मुरबाड येथे छोटेखानी क्रीडा स्टेडियम उभारण्याची मागणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली. ग्रामीण भागातील युवकांना महाराष्ट्र पोलीस दलात अधिकाधिक संधी मिळाव्यात यासाठी मुरबाड येथे पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा मानस व्यक्त केला. तसेच मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी मार्शल आर्ट प्रशिक्षण संस्था सुरू करण्याची घोषणाही त्यांनी केली.



या प्रेरणादायी उपक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी डॉ. प्रमोद हिंदुराव व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच सन्मानित माता, गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना उज्ज्वल व प्रगतीशील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, महिला, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.यावेळी मा. आ. श्री. दौलत दरोडा, प्रदेश सरचिटणीस श्री. नजीब मुल्ला, सौ. ज्योती हिंदूराव, प्रदेश सरचिटणीस श्री. किसनराव तारमळे, प्रदेश सरचिटणीस श्री. संजय तिवरे, प्रदेश सचिव रविंद्र परटोले, अंबरनाथ उपनगराध्य सदामामा पाटील, ठाणे ग्रामीण युवक जिल्हाध्यक्ष श्री. प्रतिक हिंदूराव, यांच्यासह मुरबाड तालुक्यातील आणि ठाणे जिल्हा ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.